# समृद्ध अनुभवविश्वाचे काव्य 'ऋतुरंग'

## कुलगुरू डॉ. शिर्के : डॉ. हिर्डेकर यांच्या ऋतुरंग काव्यसंग्रहाचे प्रकाशन

कोल्हापूर, ता. ३० : 'ऋतुरंग या काव्यसंग्रहातून हिर्डेकर यांचे समृद्ध अनुभवविश्व दिसते. त्यांची कविता मानवी जीवनाचे कंगोरे उलगडते. त्यामध्ये मानवी मूल्ये दिसतात. त्यांची कविता म्हणजे सर्वसामान्य, कष्टकऱ्यांची व्यथा आणि वेदना सांगणारी आहे,' असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. बी. एम. हिर्डेकर यांच्या ऋतुरंग काव्यसंग्रहाच्या प्रकाशन समारंभात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सुनीलकुमार लवटे होते. मराठी अधिविभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे, डॉ. रघुनाथ कडाकणे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी डॉ. शिर्के म्हणाले, ''माणसाचे जगणे मांडणारी कविता असे डॉ. हिर्डेकर यांच्या कवितेचे वर्णन करता येईल. त्यांच्या कवितेतून मानवी मूल्ये डोकावतात. डॉ. हिर्डेकर यांचे अनुभवविश्व समृद्ध आहे. या अनुभवविश्वाचे हे काव्य आहे. विद्यापीठातून निवृत्त झाल्यानंतरही त्यांची समाजाप्रती असणारी बांधिलकी त्यांच्या काव्यसंग्रहातून दिसते. निवृत्तीनंतर ते लिहिते झाले, हे खूप चांगले आहे.''



**कोल्हापूर : ऋतुरंग काव्यसंग्रहाचे प्रकाशन मंगळवारी करण्यात आले. यावेळी बी. एम. हिर्डेकर, रणधीर शिंदे, डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. सुनीलकुमार लवटे, डॉ. कडाकणे, प्रवीण चौगुले, भाग्यश्री पाटील-कासोटे.**

> **मी जगताना जे सोसले, अनुभवले ते मांडण्याचा प्रयत्न केला आहे. शेतकरी, कष्टकरी, महिला यांचे कष्ट मी पाहिले आहे. तेच सांगण्याचा उद्देश आहे. यातूनच ऋतुरंग काव्यसंग्रह आज प्रकाशित होत आहे.**
> **- डॉ. बी. एम. हिर्डेकर,**
> ज्येष्ठ शिक्षण तज्ज्ञ

डॉ. लवटे म्हणाले, ''हे त्यांचे काव्यात्मक आत्मचरित्र आहे. त्यांनी गावगाड्यात जगणाऱ्या माणसांची खरी ओळख करून दिली आहे.''

प्रा. डॉ. रणधीर शिंदे म्हणाले, ''हिर्डेकर यांच्या कवितेचा संवेदनस्वभाव हा संवेदनशील मनाचा संवाद आहे. त्यामुळे तो सामाजिक दृष्टिकोनातूनही महत्त्वाचा आहे.''

प्रा. डॉ. रघुनाथ कडाकणे म्हणाले, ''ऋतुरंगमधील कविता समाजभान, समाजमन घडवणाऱ्या आहेत.''

या कार्यक्रमास प्राचार्य एच. व्ही. देशपांडे, डॉ. अरुण भोसले, प्राचार्य डॉ. जी. पी. माळी, प्राचार्य डॉ. श्रीधर हेरवाडे, प्रसाद, कामत, रवींद्र ओबेरॉय, प्राचार्य डॉ. प्रवीण चौगले, प्रा. आरती चौगले, प्रा. टी. एल. पाटील, रत्नमाला हिर्डेकर, 'सकाळ'चे उपसंपादक रंगराव हिर्डेकर, विजय टिपुगडे, बाजीराव ढवळे उपस्थित होते. डॉ. आलोक जत्राटकर यांनी सूत्रसंचालन केले. भाग्यश्री पाटील-कासोटे यांनी आभार मानले.

पुण्यनगरी

# विद्यापीठातील खेळाडूंना मिळणार आधुनिक सुविधा

## इनडोअर कॉम्प्लेक्समध्ये व्हॉलीबॉल, बास्केटबॉल, बॅडमिंटन, शूटिंग रेंजची सोय

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

कोल्हापूर हे विविध खेळांचे माहेरघर आहे. खेळांची ही परंपरा जोपासण्यात शिवाजी विद्यापीठाचा मोठा वाटा आहे. सध्याच्या खेळाडूंना अधिकाधिक सुविधा मिळाव्यात तसेच नवीन खेळाडू निर्माण व्हावेत यासाठी शिवाजी विद्यापीठाने यावर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये भरघोस तरतूद केली आहे. त्याचा लाभ खेळाडूंना मोठ्या प्रमाणात होणार आहे.

संस्थानकाळापासूनच कोल्हापूरमधील खेळाडूंना राजाश्रय मिळाला, तर पुढील काळात येथील खेळांची ही परंपरा खेळाडूंनी कायम ठेवली. शिवाजी विद्यापीठाच्या माध्यमातून खेळाडूंना योग्य मार्गदर्शन मिळाल्याने त्यांची कामगिरी अधिक बहरली; मात्र अलीकडील काही वर्षांत खेळांसाठी सुविधा नसल्याने अनेक खेळाडूंना अन्य जिल्ह्यात सरावासाठी जावे लागले. त्यामुळे विद्यापीठातर्फे खेळाडूंसाठी अधिकाधिक सुविधा निर्माण करण्यात येत आहेत. येत्या काळात विद्यापीठामध्ये इनडोअर स्पोर्टस् कॉम्प्लेक्स उभारण्यात येणार आहे. यामध्ये व्हॉलीबॉल, बास्केटबॉल, बॅडमिंटन, शूटिंग रेंज, टेबल टेनिस, व्यायामशाळा आदी तयार करण्यात येणार आहे. इनडोअर या सर्व सुविधा मिळाल्याने खेळाडूंना दिवसभरात कधीही सराव करता येणार आहे.



### या आहेत अर्थसंकल्पातील तरतुदी

शिवाजी विद्यापीठातर्फे विविध खेळ स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम, शिबिरांमध्ये सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना आवश्यकतेनुसार वैद्यकीय उपचारासाठी १० लाख रुपयांची तरतूद. विद्यापीठातील खेळांची मैदाने सुस्थितीत राहण्यासाठी घसारा निधीतून ३७ लाख रुपयांची तरतूद. इनडोअर खेळांच्या विविध सोयी उपलब्ध होण्यासाठी इनडोअर स्पोर्टस् कॉम्प्लेक्ससाठी ५० लाख रुपयांची तरतूद. स्पोर्टस् होस्टेलसाठी नवीन इमारत बांधण्यासाठी ५० लाख रुपयांची तरतूद.



### जागतिक खेळाडू घडवण्याचे ध्येय

शिवाजी विद्यापीठातील खेळाडू जागतिक पातळीवर मोठ्या प्रमाणात चमकावेत यासाठी विद्यापीठाचे प्रयत्न सुरू आहेत. विद्यापीठ कार्यक्षेत्रातील अनेक खेळाडू अन्य ठिकाणी सरावासाठी जातात. त्यांना विद्यापीठातच चांगल्या पद्धतीच्या सुविधा निर्माण करून दिल्या जाणार आहेत.

– **पी. टी. गायकवाड,** संचालक, क्रीडा व शारीरिक शिक्षण

# साहित्यिकांच्या प्रतिमांनी सजले दालन

## नव्या पिढीसाठी ठेवा; शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागाचा उपक्रम



कोल्हापूर, ता. ३० : साठ साहित्यिकांच्या प्रतिमांनी शिवाजी विद्यापीठाचा मराठी अधिविभाग सजला आहे. ज्ञानपीठ विजेत्यांसह मराठी साहित्यात कसदार लेखन करणाऱ्या लेखकांचा त्यात समावेश असून, तीन वर्षांत हा प्रकल्प पूर्ण झाला.

भाषिक परंपरा, लेखकांचे योगदान, साहित्यनिर्मितीतून मराठी भाषेची वाढलेली उंची नव्या पिढीला कळण्याकरिता साहित्यिकांचा परिचय व्हावा, असा अधिविभागाचा हेतू होता. त्यासाठी त्यांच्या प्रतिमा अधिविभागात लावण्याचा निर्णय माजी विभागप्रमुख डॉ. राजन गवस यांच्या कार्यकाळात झाला.

ज्ञानपीठ पुरस्कार विजेते विंदा करंदीकर, वि. स. खांडेकर, वि. वा. शिरवाडकर, भालचंद्र नेमाडे यांच्यासह 'मृत्युंजय'कार शिवाजी सावंत, गो. मा. पवार, रणजित देसाई, बाबा कदम, इंदिरा संत, दिलीप चित्रे, पुष्पा भावे, सुधीर रसाळ अशा ६० लेखकांच्या प्रतिमा रेखाटण्याचे काम गारगोटीतील रवींद्र गुरव यांच्याकडे सोपविण्यात आले. अधिविभागाला साजेल अशा फ्रेममध्ये प्रतिमा रेखाटल्या गेल्या.

विशेष म्हणजे १९८० मध्ये अधिविभागात मराठी साहित्याविषयी कार्यक्रम झाला आणि तो गाजला. त्याची आठवण करून देणारे छायाचित्र लावले आहे. मराठी साहित्यातील महत्त्वाच्या लेखकांचा त्यात सहभाग होता. गोमटेश्वर येथील मराठी भाषा निर्मितीचा शिलालेखाचा फोटोही विभागाच्या प्रवेशद्वारासमोर लावण्यात आला आहे.

**" अधिविभागात येणाऱ्या विद्यार्थ्यांना या प्रतिमांमधून साहित्यिकांचे कार्य कळण्यास मदत होते. अनेकांनी केवळ नावे वाचलेली असतात. मात्र, त्यांचे चेहरे माहीत असतातच, असे नाही. या उपक्रमामुळे मराठी साहित्यात मोलाचे योगदान देणाऱ्या लेखकांची ओळख नव्या पिढीला होण्यास मदत होत आहे.**

– **रवी लोंढे,** पीएच.डी. संशोधक विद्यार्थी

# विद्यापीठ दीक्षान्त समारंभ; समित्यांचे कामकाज सुरू

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाचा ५७ वा दीक्षान्त समारंभ दि. ६ एप्रिल रोजी ऑनलाईन साध्या पद्धतीने साजरा केला जाणार आहे. त्या अनुषंगाने विविध समित्यांचे कामकाज सुरू झाले आहे.

परीक्षा विभागाच्या वतीने दीक्षान्त समारंभाची तयारी सुरू आहे. मंगळवारी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक जी. आर. पळसे यांच्या प्रमुख उपस्थितीत दीक्षान्त समारंभासंदर्भात बैठक झाली. यात समित्यांना कामकाजाबाबत सूचना देण्यात आल्या. दि. ६ एप्रिलला सकाळी ११ वाजता राजर्षी शाहू सिनेट सभागृहात दीक्षान्त समारंभ होईल. समारंभासाठी राज्यपाल भगत सिंह कोश्यारी अध्यक्षस्थान भूषविणार आहेत. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेचे अध्यक्ष डॉ. अनिल सहस्रबुद्धे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

# शिवाजी विद्यापीठातर्फे ऑनलाईन परीक्षेला ९०७ विद्यार्थी

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातर्फे सुरू असलेल्या परीक्षेअंतर्गत मंगळवारी ९१२ पैकी ९०७ विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पद्धतीने परीक्षा दिली. विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२० च्या परीक्षांना ऑनलाईन व ऑफलाईन पद्धतीने सुरुवात झाली आहे. मंगळवारी बी.कॉम.-आयटी, बी.कॉम.-बँक मॅनेजमेंट, बी.एस्सी.-आयटी, बी.एस्सी.-फॉरेन्सिक सायन्स, बीसीएस, बीबीए, बीसीए, बीएसडब्ल्यू, बी.व्होक. अभ्यासक्रमाच्या परीक्षा पार पडल्या. ज्या विद्यार्थ्यांनी २३ ते २५ मार्च दरम्यान ऑफलाईन टू ऑनलाईन पर्याय बदललेल्या विद्यार्थ्यांना मॉक टेस्टसाठीचा यूजर आय.डी. व पासवर्ड त्यांच्या रजिस्टर्ड मोबाईलवर पाठविण्यात आले आहेत.

# अजिंक्य पाटील सलग तिसऱ्या वर्षी विद्यापीठ टॉपर

## डीवायपीसीईटीचा गुणवंत विद्यार्थी

**कसबा बावडा : पुढारी वृत्तसेवा**

येथील डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीचा बी. ई. मॅकेनिकल विद्यार्थी अजिंक्य संजय पाटील हा तृतीय वर्ष परीक्षेत शिवाजी विद्यापीठात प्रथम आला. त्याने 'यशवंतराव पांडुरंगराव पवार' पारितोषिक पटकावले. सलग तिसऱ्या वर्षी मॅकेनिकल विभागात विद्यापीठात अव्वल येण्याचा मान त्याने मिळवला आहे.

त्याचबरोबर महाविद्यालयाची बी. ई. सिव्हिलची विद्यार्थिनी प्राजक्ता प्रकाश खाडे हिला कन्स्ट्रक्शन प्रॅक्टिस विषयात सर्वप्रथम आल्याबद्दल 'राधा-माधव' आणि 'स्व. शंकरराव रामराव नागेशकर स्मृती पुरस्कार' तर डिझाईन



**अजिंक्य पाटील**

ऑफ कॉन्क्रीट स्ट्रक्चर-२ या विषयात सर्वोत्तम गुण मिळाल्याबद्दल 'प्रा. सी. जी. काळे' पुरस्कार जाहीर झाला आहे.

अजिंक्य पाटीलसह पुरस्कार विजेत्या सर्व विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष डॉ. संजय डी. पाटील, उपाध्यक्ष गृहराज्यमंत्री सतेज पाटील, विश्वस्त आमदार ऋतुराज पाटील व पृथ्वीराज पाटील, कार्यकारी अध्यक्ष डॉ. ए. के. गुप्ता, प्राचार्य डॉ. संतोषकुमार चेडे यांनी अभिनंदन केले आहे.